# प्रेसनोट

## पदभरतीसाठी जाहीर आवाहन.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर. यांचे कडून गट-ड ( चतुर्थ श्रेणी ) संवर्गातील विविध ७९ पदांच्या भरतीसाठी या संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

या पदांची भरती प्रक्रिया "टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस" ( Tata Consultancy Services ) मार्फत ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. या पदासाठी अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया दिनांक २०/०८/२०२६ रोजी पासून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर या संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर ( https://www.vdgmclatur.org ) "टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस" (Tata Consultancy Services) यांची Online अर्ज भरण्याची लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या भरती प्रक्रियेसाठी अधिष्ठाता कार्यालयातील कोणत्याही अधिकारी/कर्मचारी तसेच त्रयस्थ व्यक्ती यांचेशी कसल्याही प्रकारचा कागदपत्राचा किंवा आर्थिक बाबींचा व्यवहार करु नये. अशा प्रकारची फसवणूक अथवा बनावट नियुक्ती पत्रे दिल्यास त्यास अधिष्ठाता / संस्था जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच अशा कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीची शक्यता वाटल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा सायबर क्राईम विभागाशी त्वरित संपर्क साधावा असेही आवाहन डॉ. उदय मोहिते, अधिष्ठाता, यांनी केले आहे.

डॉ. उदय मोहिते,
**अधिष्ठाता,**
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय, लातूर.